# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



३१/०८/२०१५

---

**हिंदुस्थानच्या नवरचनेचं चिंतन**

आता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची घडी नव्यानं बसणार कशी? ती कोण बसवणार? हिंदुस्थानच्या नवीन रचनेतील मूलभूत रसायनं कोणती? प्रक्रिया कोणत्या? कामाची दिशा कोणती?

स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार करताना आप्पांना वारंवार असं वाटत असे की पक्षांमधली दुही, संघटनांमधली दुही, यांमुळे स्वातंत्र्य चळवळ जशी प्रभावी व्हायला हवी होती तशी झाली नाही. यापुढे जाऊन ते म्हणत की परस्परांच्या विरुद्ध उभ्या राहणाऱ्या राजकीय, सामाजिक आणि राष्ट्रीय संघटना असं दृश्य जाऊन त्या जागी परस्परांना साहाय्यभूत होणाऱ्या राजकीय, सामाजिक आणि राष्ट्रीय संघटन उभ्या राहिल्या पाहिजेत.

सशस्त्र क्रांतिकारक गटांची आवश्यकता आता उरलेली नव्हती. पुष्कळसे स्वातंत्र्यसैनिक सक्रिय राजकारणात शिरले आणि निवडून आले. काहींनी स्वास्थ्यसंपन्न कुटुंबजीवन स्वीकारलं. पण ज्या काही व्यक्तींना स्वतंत्र हिंदुस्थानपुढच्या रचनात्मक आव्हानांची जाण होती, अशांमध्ये आप्पा होते. त्यांनी प्रपंचात पडण्याचा विचारच केला नाही. या नव्या आव्हानांना सामोरं जाण्याचे, कार्याच्या नव्या दिशा शोधण्याचे वेध त्यांना लागले होते. हे नवं चिंतन आप्पांच्या 'विवेकानंद काय म्हणाले?' (आता चौथ्या आवृत्तीचं नाव 'विवेकानंदांचा राष्ट्रधर्म') या पुस्तकाच्या उपसंहारात १९५२ साली त्यांनी मांडलं आहे.

'आज देशापुढे विविध प्रश्न आहेत. उत्पादनाचे आहेत, मजुरीचे आहेत, राष्ट्रीयीकरणाचे आहेत, शिक्षणाचे आहेत; प्रांतरचनेचे आहेत, आरोग्यविषयक आहेत; अन्नधान्याचे आहेत, दळणवळणाचे आहेत; नानाविध प्रश्न आहेत. कोट्यावधी लोकांमध्ये प्रत्येक व्यक्तिगणिक एक असे कोट्यावधी प्रश्न आहेत. या प्रश्नांचं निरसन फुटकळ उपायांनी, स्थानिक वा प्रांतिक योजनेनं होणार नाही. तर एकराष्ट्रीयत्वाच्या अभिमानातून रसरसून आलेल्या, देशभक्तीच्या तेजाने प्रज्वलित झालेल्या लक्ष लक्ष आणि कोटी कोटी बांधवांचे हात देशाच्या बांधणुकीकडे लागणे, स्वार्थत्यागाची परिसीमा गाठून

लाचलुचपत, पिळवणूक, राष्ट्रीय चारित्र्यहीनता यांना स्वत:च्या नैतिक सामर्थ्याने पायबंद घालून एका बाजूला शेती सुधारणे, रस्ते बांधणे, बांधबंधारे घालणे, नानाविध कारखान्यांतून अधिकाधिक उत्पादन करणे, अशा रीतीने देशाच्या लौकिक संपत्तीत भर घालणे आणि दुसऱ्या बाजूने शिक्षणाचा झरा, इतिहासज्ञानाचा झरा, धर्मसंस्कृतीचा झरा, असे विविध झरे वाहते ठेवून या कोट्यावधी जनतेला हिंदुत्वाचा, राष्ट्रीयत्वाचा प्रत्यक्ष साक्षात्कार घडवणे यांतून होणार आहे.'

स्वातंत्र्योत्तर कालातील कार्याची आप्पांची कल्पना ही अशी होती. १९६२ साली स्थापन झालेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची जणू संकल्पित रूपरेखाच वरील परिच्छेदात त्यांनी लिहून ठेवली आहे.

---